# मेट्रो-३ ची दुसरी ट्रेन शहरात दाखल

**मुंबई :पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा-वांद्रे -सीप्झ मेट्रो ३ मार्गाच्या दुसऱ्या ट्रेनचे सर्व आठ डबे मुंबईत दाखल झाले असून लवकरच त्यांची जोडणी करून चाचणी घेतली जाईल. यापूर्वीच पहिल्या ट्रेनने १,५०० किमी पेक्षा जास्त ट्रायल रनद्वारे सर्व डायनॅमिक आणि स्टॅटिक चाचण्या यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत.

२९ डिसेंबर २०२२ रोजी आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथील ऑल्स्टॉम प्लांटमध्ये तयार झालेली दुसरी ८ डब्यांची ट्रेन मुंबईत दाखल झाली आहे. या ट्रेनच्या सारिपुत नगर आणि सहार येथील रॅम्प दरम्यान ५ किमीच्या अंतरावर आवश्यक चाचण्या घेतल्या जातील. प्रत्येकी ४२ टन वजनाचे हे सर्व ८



डबे ६४ चाकांच्या विशेष ८ ॲक्सेल ट्रेलरने १० दिवसांत आंध्र प्रदेशातून १,४०० किमी अंतर पार करत मुंबईत दाखल झाले आहेत.

२०२३ मध्ये मेट्रो-३ मार्गावरील आरे ते बीकेसीपर्यंतचा पहिला टप्पा सुरू करणार आहोत, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.

मेट्रो ३ मार्गवर ३० नोव्हेंबर २०२२ रोजी ५४.५ किमी अप आणि डाउन मार्गाचे संपूर्ण भुयारिकरणाचे काम पूर्ण झाले आहे,असे प्रकल्प संचालक एस.के.गुप्ता यांनी सांगितले. तर,१०५ सरकते जीने , १९ उद्वाहक , १० प्लॅटफॉर्म स्क्रीन दरवाजे आणि १२ प्रवासी माहिती डिस्प्ले सिस्टीम विविध स्थानकांवर बसवण्यात आल्या आहेत,असे संचालक (प्रणाली) ए. ए. भट्ट यांनी सांगितले.